# रेप्टाइल्स ऑफ द नॉर्दर्न वेस्टर्न घाट्स सह्याद्रीतील सरपटत्या प्राण्यांच्या विश्वाचा टाटा पॉवर व ईला फाऊंडेशनने घेतला माहितीपूर्ण धांडोळा

## महाराष्ट्रातील पश्चिम घाटामधील सरपटत्या प्राण्यांच्या प्रजातींच्या माहितीचे पुस्तकामध्ये संकलन; साप, मगरी, कासवे, पाली व सरड्यांचा समावेश

मुंबई, : टाटा पॉवरने ईला फाऊंडेशनच्या सहयोगाने आज आपल्या रेप्टाइल्स ऑफ द नॉर्दर्न वेस्टर्न घाट्स या जैवविविधता मालिकेतील तिसरे पुस्तक सर्वांसमोर आणले. हे पुस्तक म्हणजे सरपटणाऱ्या प्राण्यांच्या १२३ सुंदर व सर्वाधिक धोक्यातील प्रजातींचे संकलन आहे. पश्चिम घाटातील जैवविविधता टिकवून ठेवण्यात या प्रजातींचे योगदान मोठे आहे. पुस्तकाचे प्रकाशन कंपनीच्या परिचलन व वितरण विभागाचे अध्यक्ष श्री. मिलेश की यांच्या हस्ते झाले. त्यावेळी पुस्तकाचे सहलेखक व झोकून देऊन काम करणारे पर्यावरणवादी तसेच ईला फाऊंडेशनचे संचालक डॉ. सतीश पांडे आणि टाटा पॉवरमधील विभागाचे हेड इस्टेट श्री. विवेक विश्वासराव उपस्थित होते.





जगातील सर्वात महत्वाच्या जैवविविधता केंद्रांपैकी एक असलेल्या पश्चिम घाटातील साप, मगरी, कासवे, पाली, सरडे यांच्या प्रजातींविषयीच्या माहितीचे संकलन या पुस्तकामध्ये करण्यात आले आहे. पश्चिम घाटाच्या उत्तर भागात गेल्या अनेक वर्षांपासून जतन करण्यात आलेल्या या जैवविविधतेच्या समृद्धीची माहिती या पुस्तकामुळे लेखकांच्या नजरेतून मिळते.

**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये:**

पश्चिम घाटाच्या उत्तर भागातील सरपटत्या प्राण्यांवर आधारित अशा प्रकारचे पहिलेच पुस्तक * जंगलात कॅमेराबद्ध केलेल्या सरपटणाऱ्या प्राण्यांच्या १२३ प्रजातींची तपशीलवार माहिती * सापाच्या विविध प्रजातींवर भर; मगरी, कासवे, पाली व सरड्यांच्या अनेक प्रजातींचाही यात समावेश आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या संवर्धनविषयक परिस्थितीची माहितीही देण्यात आली आहे. * वनअभ्यासक, शेतकरी, जीवशास्त्रज्ञ, अध्यापक, पर्यावरणवादी आणि हौशी अभ्यासकांसाठी उपयुक्त *कुशल फोटोग्राफर्सनी काढलेल्या ५०० हून अधिक दर्जेदार फोटोंचा तसेच प्रख्यात कलावंतांनी केलेल्या इलस्ट्रेशन्सचा पुस्तकात समावेश.

टाटा पॉवरचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रवीर सिन्हा म्हणाले, 'टाटा पॉवर आपल्या पश्चिम घाटाच्या उत्तर भागातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील जैवविविधतेचे संरक्षण व जतन करून पर्यावरण संवर्धनात सक्रिय भूमिका पार पाडत आहे. आम्ही या कार्याप्रती वचनबद्ध आहोत.

ईला फाऊंडेशनसोबत तिसऱ्यांदा सहयोग करण्याची संधी लाभल्याबद्दल आम्ही खूप आनंदी आहोत. सरपटणाऱ्या प्राण्यांच्या धोक्यातील प्रजातींच्या तसेच गेल्या लक्षावधी वर्षांपासून उत्क्रांत होत असलेल्या त्यांच्या नैसर्गिक अधिवासांच्या संवर्धनासाठी आम्ही तेवढे वचनबद्ध आहोत, तेवढीच बांधिलकी या संस्थेचीही आहे, असे परिचलन व वितरण विभागाचे अध्यक्ष मिलेश की म्हणाले.

ईला फाऊंडेशनचे संचालक प्राध्यापक डॉ. सतीश पांडे म्हणाले, हे पुस्तक म्हणजे लोकांना पर्यावरण संवर्धनाबद्दल संवेदनशील बनवण्याचा एक प्रयत्न आहे. हे पुस्तक त्यांच्यासाठी उत्तम मार्गदर्शन ठरेल आणि त्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण करेल.'

या पुस्तकासाठी मजकूर (कंटेण्ट) विकसित करण्यात श्री. रोहन पंडित आणि श्री. उन्मेष बारभाई यांनी योगदान दिले आहे. रेप्टाइल्स ऑफ द नॉर्दर्न वेस्टर्न घाट्स हे जैवविविधता मालिकेतील ईला फाऊंडेशनच्या सहयोगाने काढण्यात आलेले तिसरे पुस्तक आहे. यापूर्वी बर्ड्स ऑफ लोणावळा ॲंड खंडाळा आणि द वाइल्ड ऑर्किड्स ऑफ द नॉर्दर्न वेस्टर्न घाट्स ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.